## नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५५/२०२१ मधील आदेश नि.क्र.३२
(CNR No.MHSO130006822021)

१. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल करण्यात यावा याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादीविरुध्द दि.१४/३/२०२२ रोजी विना कैफियत आदेश झालेले आहेत. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून उशीर केला नाही. प्रतिवादीविरुध्द नि.क्र.५ वर आदेश झाले आहेत. प्रतिवादी यांनी कोर्टाच्या आदेशाविरुध्द अपिल केले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना म्हणणे देणेस विलंब झाला आहे. दि.१४/३/२०२२ रोजीचा विना कैफियत आदेश रद्द न केल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी त्यांचेविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल करण्यात यावे.

३. सदर अर्जावर वादीचे म्हणणे मागविण्यात आले. वादीने त्यांचे म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज व त्यामधील मजकूर हा खोटा आहे. विलंब का झाला याबाबतचे कारण हे प्रामाणिक व योग्य नाही. प्रतिवादीने फार मोठया विलंबाने म्हणजेच ६ महिन्याचे विलंबाने कैफीयत दिली आहे. अर्जातील कारण खोटे असल्यामुळे व प्रतिवादीने हेतुपुरस्सर विलंब केला असल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर अर्ज मंजूर करावयाचा असल्यास रुपये २०००/– कॉस्ट प्रतिवादीस करण्यात यावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सदर अर्जावर वादी व प्रतिवादी यांनी युक्तीवाद केला नसल्यामुळे सदर अर्ज विना युक्तीवाद पुढे चालविण्यात आला. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स दि.२४/१०/२०२१ रोजी प्राप्त झाल्याचे बेलिफ अहवालावरुन दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ प्रमाणे वादीच्या दाव्यास प्रतिवादीने समन्स प्राप्त झालेपासून ३० दिवसाचे आत कैफियत दाखल करायची असते. त्यानंतरही ९० दिवसाची मुदत न्यायालयाच्या परवानगीने दिली जावू शकते. मात्र सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल केल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्याअनुषंगाने प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता प्रतिवादीवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य वाटते. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

## आ दे श

१. प्रतिवादी यांचेवर रक्कम रुपये रु.८००/– (रक्कम रुपये आठशे) खर्च बसवून अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस दिल्यानंतर त्यांचेविरुध्द पारीत विना कैफियत आदेश रद्दबातल होईल.

३. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी.

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2023.01.20 11:56:16 +0530

बार्शी. (एन.एस.सबनीस)

दिनांकः– १९/१/२०२३ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is  same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Y. V. Sital |
| (b) | Court | : | Shri. N.S.Sabnis<br>4$^{th}$ Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19.1.2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 20.1.2023 |